# बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या विद्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी
वास्को


अर्णव गुप्ता


अकुल गुप्ता


अभिराज हिंगे


हर्ष विजय


सिद्धार्थ पाटील


मेहुल मोहन

सांकवाळ येथील बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या अर्णव गुप्ता, अकुल गुप्ता, अभिराज हिंगे, हर्ष विजय, सिद्धार्थ पाटील व मेहुल मोहन या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

बिटस् पिलानीच्या बायोलॉजीकल सायन्सच्या चौथ्या वर्षातील विद्यार्थी अर्णव गुप्ता याला मिटाक्स ग्लोबलिंक रिसर्च इंटर्नशिप हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. अर्णव गुप्ता हा कॅनडा सरकार पुरस्कृत 'बायोइन्फॉर्मेटीक्स टेक्नीशियन इन जीनोमीक्स ॲण्ड मेटाजीनोमीक्स'' मध्ये संशोधन करणार आहे. या संशोधनासाठी अर्णव यांना किंगस्टन कॅनडा येथील क्वीन्स युनिव्हर्सिटीचे प्रा. रॉबर्ट कोलौट्टी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. मिटाक्स ग्लोबलिंक रिसर्च इन्टरशिप या स्पर्धात्मक कार्यक्रमात ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन, फ्रान्स, जर्मनी, हाँगकाँग एसएआर, इंडिया, मेक्सिको, ट्युनिसिया, युनायटेड किंगडम व युक्रेनच्या आंतरराष्ट्रीय पदवीधर विद्यार्थ्यांचा समावेश असेल. कॅनेडियन विद्यापीठात मे ते ऑक्टोबर या कालावधीत १२ आठवड्यांच्या संशोधन प्रकल्पात तज्ज्ञ संशोधक व टॉप रँकड आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा समावेश असेल. संशोधन इंटर्नशिप कॅनडियन विद्यापीठाच्या सदस्यांच्या देखरेखेखाली होणार आहे.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या कॉम्प्युटर सायन्सचा तिसऱ्या वर्षातील विद्यार्थी अकुल गुप्ता यांना कॅनडा सरकार पुरस्कृत मीटाक्स ग्लोबलिंग रिसर्च इंटर्नशिप हा प्रतिष्टेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. अकुल गुप्ता हा आल्बर्टा कॅनडा येथील युनिव्हर्सिटी ऑफ कल्गारी येथे प्रा. हडी हेम्मटी यांच्या मार्गदर्शनाखाली 'टेस्टींग ऑफ मशिन लर्निंग प्रोग्राम''वर संशोधन करणार आहे. मीटाक्स ग्लोबलिंग रिसर्च इंटर्नशिप हा आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक कार्यक्रम असून या कार्यक्रमात ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन, फ्रान्स, जर्मनी, हाँगकाँग एसएआर, भारत, मेक्सीको, तुनिसिया, युनायटेड किंगडम व युक्रेनच्या पदवीधर विद्यार्थ्यांचा समावेश असेल. कॅनेडियन विद्यापीठात मे ते ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या १२ आठवड्यांच्या संशोधन, प्रकल्पात तज्ज्ञ संशोधक व टॉप रँकड आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा समावेश असेल. संशोधन इंटर्नशिप कॅनडियन विद्यापीठाच्या सदस्यांच्या देखरेखेखाली होणार आहे.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या कॉम्पुटर सायन्सचा तिसऱ्या वर्षातील विद्यार्थी अभिराज हिंगे याची इकॉनॉमीक टाईम्स कॅम्पस स्टार्स - क्लास ऑफ २०१८-१९ साठी निवड झाली आहे. यावर्षी भारतातील २००० पेक्षा जास्त अभियांत्रीकी महाविद्यालयातून ३५,००० अर्जदारांमधून ९१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली झाली होती. चार फेऱ्यांमध्ये ही निवड करण्यात आली आहे.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या फिजीक्सचा पहिल्या वर्षातील विद्यार्थी हर्ष विजयने नॅशनल ग्रॅज्युएट फिजीक्स एक्झामिनेशन (एनजीपीई) मध्ये २१ वा क्रमांक पटकावला. हर्ष विजय हा देशातील प्रतिष्ठीत महाविद्यालय/विश्वविद्यालयातील ७२ विद्यार्थ्यांपैकी बिटस् पिलानीचा एकमेव विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होणार आहे.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या ईईई विभागातील इएनआयच्या चौथ्या वर्षातील विद्यार्थी सिद्धार्थ विठ्ठल पाटील याची इंटरनॅशनल लिंकेज डीग्री प्रोग्राम फॉर डेव्हलपींग इन्नोवेटर्स ट्रान्सफॉर्मिंग एडव्हान्स टेक्नॉलॉजिमध्ये 'आयएलडीपी स्टार्ट प्लस २०१९' मध्ये निवड झाली आहे. हा कार्यक्रम हिरोशिमा युनिव्हर्सिमध्ये २४ जून ते ३० जून २०१९ या कालावधीत होणार आहे.

बिटस् पिलानीच्या कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इन्फोर्मेशन सिस्टमच्या दुसऱ्या वर्षातील विद्यार्थी मेहुल मोहन हा सां जुझे कालिफोर्नीया (युएसए) येथे ३ ते ७ जुन २०१९ रोजी एपल वर्ल्डवाईड डेव्हलपर्स कॉन्फरन्समध्ये सहभागी होणार आहे. त्याला शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. वर्ल्ड व्हाईड डेव्हेलपर्स कॉन्फरन्समध्ये जगातील २५०-३०० विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. याप्रसंगी भारताचे नऊ विद्यार्थी सहभागी होतील.